महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

## सांस्कृतिक कार्य संचालनालय (खुद्द)
## मुंबई ४०० ० ३२.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (२) मधील तरतूदीनुसार

# सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई नागरिकांची सनद

## प्रस्तावना

सांस्कृतिक कार्य संचालनालय हे पर्यटन व सांस्कृतिक कार्य यांच्या अखत्यारित कार्यरत आहे. सांस्कृतिक ही बाब मुलभुत गरजांबरोबरच महत्वाची आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात बौद्धिक तसेच शारिरिक काम करणाऱ्या व्यक्तींना सांस्कृतिक माध्यमातून विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने करमणूकीद्वारा मनावर असलेला ताण कमी होण्यास मदत होते.

सांस्कृतिक कार्यक्रमाच्या विविध विषयांच्या माध्यमातून समाजात समाजप्रबोधन होऊन जनजागृती निर्माण होते. करमणूक होते. प्रसार वाहिन्या, दैनिकातून तसेच विविध मासिकातून छापून आलेल्या सांस्कृतिक स्तंभातून,लेखातून सांस्कृतिक चळवळ ही अधिक बळकट होण्यास मदत झालेली आहे.

महाराष्ट्र शासनाने कलाकारांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या दृष्टीने अनेक योजना व उपक्रम राबविले आहेत. तळागाळातील उदयौन्मुख कलाकार यांना स्वताचे हक्काचे व्यासपीठ मिळत नाही. त्यादृष्टीने राज्य नाटय स्पर्धा,चित्रपट स्पर्धा, लावणी महोत्सव, तमाशा महोत्सव, तसेच अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संधी दिली आहे. उदयोन्मुख कलाकारांतून अनेक व्यावसायिक नाटय व चित्रपट या कलाक्षेत्रात प्रतिथ यश झालेले कलाकार दिसून येतात. शिवाय सांस्कृतिक चळवळ अधिक बळकट होण्याच्या दृष्टीने विविध अनुदान योजना तयार करुन त्या कलेचा विकास तसेच कलाकारांचा स्तर उंचावण्यास मदत झालेली आहे.

अलीकडे व्यावसायिक नाटय निर्मात्यांना त्यांच्या नविन नाटय निर्मितीसाठी भरघोस अनुदान देऊन नाटयनिर्मिती उंचावण्याचे व वाढविण्याचे काम आज प्रगतीपथावर आहे. तमाशा या कलाक्षेत्राकडे दुर्लक्षीत झालेले क्षेत्र हे अनुदानाच्या माध्यमातून स्थिर व बळकट करण्यामागे अनुदानाचा उपयोग झालेला दिसून येतो. तसेच विविध पारंपारिक कला जसे दशावतार कला, लावणी, खडीगंमत, शाहिरी, भजन,किर्तन,जादुगार,नकलाकार,बोलक्या बाहुल्या, कसरतिच्या सांस्कृतिक माध्यमातून कला, विविध ग्रामिण पारंपारिक नृत्य इत्यादी कलांचा ऱ्हास होत असताना त्यांना आधार देण्याचे कार्य विविध अनुदान पॅकेज योजनेंतर्गत सांस्कृतिक कार्य विभागाकडून वेळोवेळी झालेले आहे.

नोंदणीकृत संस्थांना अनुदान या योजनेखाली सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थांना विविध कला क्षेत्रात येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन तसेच त्यांच्या ऐकूण योजनांना बळकटी देण्याच्या उद्देशाने भरघोस रक्कम पुर्ण राज्यभर दरवर्षी दोन टप्यात देण्यात येते.

कलाकारांने त्यांच्या हयातीत सांस्कृतिक कार्य करुन त्या-त्या क्षेत्रातील कलाकार वयोवृद्ध झाल्यानंतर त्यांच्याकडून कलासादर होत नसते त्यासाठी त्यांच्या उतार वयात त्यांना मासिक मानधन देण्याची योजना आहे. सदर योजना ही पुर्ण राज्यभर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मदतीने राबविली जाते. त्यामुळे खऱ्याअर्थाने सांस्कृतिक क्षेत्र पुर्ण राज्यभर सजीव ठेवण्याचे कार्य सातत्याने होत आहे.

सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने कामगिरी केलेल्या बुजुर्ग व मान्यवर कलाकारांना पुरस्कारांपासून वंचित रहावे लागते. त्यासाठी शासनाने विविध पुरस्कार त्यांच्या कलाक्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन त्या त्या क्षेत्रातील पुरस्कार शासनाने गठीत केलेल्या समिती मार्फत शिफारशी विचारात घेऊन शासन स्तरावरुन उचित व्यक्तींना पुरस्कार घोषित केला जातो. सोबत यादी जोडण्यात आली आहे.

या संचालनालयामार्फत विविध प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करण्यात येते. त्यात नाटय,तमाशा,शाहिरी,किर्तन इत्यादी कलाक्षेत्रांचा समावेश आहे. सोबत यादी जोडण्यात आली आहे.

## <u>उद्दिष्टे :</u>

**सांस्कृतिक कार्य या क्षेत्रात उदिष्टांची पुर्तता करण्यासाठी कटीबद्ध आहे.**

**१)** कलेचे जतन व संवर्धन करणे.

२) उदयोंन्मुख कलाकारांना त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांची कला अधिकाधिक विकसित व्हावी.

३) कलाकारांना स्वताचे हक्काचे व्यासपिठ मिळावे यासाठी प्रयत्न करणे.

४) ग्रामीण भागातील कलाकारांना कलेचे प्राथमिक ज्ञान मिळावे. यादृष्टीने विविध शिबिरांचे आयोजन करणे

५) दुर्लक्षीत कलाकारांना कार्यक्रम मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

६) कला संस्थांना त्यांच्या प्राथमिक गरजा पुर्ण करण्यासाठी विविध कला क्षेत्रातील संस्थांना भाग भांडवली अनुदान देणे व त्यातुन कला समृद्ध करणे.

७) कलेला वाव देण्याच्या उद्देशाने व कलाकारांचे प्रश्न तातडीने निपटारा करण्यासाठी राज्यातील सहा महसुली विभागात सांस्कृतिक कार्य संचालनालयाची कार्यालये विभागीय स्तरावर स्थापित करणे.

८) वंचित झालेल्या व त्या त्या क्षेत्रातील योगदान असलेल्या कलकारांना शासनाने गठीत केलेल्या समितीमार्फत शिफारस केलेल्या कलाकार व्यक्तींना पुरस्काराने संन्मानित करणे.

९) सांस्कृतिक धोरणानुसार कला विषयक बाबीं अंतिमतः मंजुरी नंतर अंमलबजावणी करणे.

१०) नाटय, चित्रपट, लावणी, तमाशा, या कलाक्षेत्रातील स्पर्धांचे आयोजन करुन कलेस प्रोत्साहन देणे.

११) रंगभवन या खुल्या नाटयगृहाचे बंदिस्त नाटयगृहात रुपांतर करुन जास्तीत जास्त करमणूकीचे कार्यक्रम सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देणे.

## <u>कार्यालयाची संरचना</u>

| विभाग | अधिकारी/कर्मचारी | विषय |
|---|---|---|
| **विभागप्रमुख** | **श्री.आशुतोष घोरपडे, संचालक** | **विभागप्रमुख** |
| आस्थापना विभाग महोत्सव | श्रीमती मीनल जोगळेकर, सहसंचालक | १.आस्थापना विषयक कामे<br>२. सांस्कृतिक कार्यक्रम संदर्भातील कामे<br>३. प्रशासकीय कामकाज व कार्यक्रमाचे नियोजन |
| नाटयशाखा चित्रपट शाखा व इतर महोत्सव | श्री.आ.स.जगताप, कार्यक्रम अधिकारी | १. चित्रपट महोत्सव<br>२. नाटय महोत्सव<br>३. प्रजासत्ताक दिन,नवी दिल्ली<br>४. इतर अनुषंगिक महोत्सवाचे कामकाज |
| आस्थापना शाखा<br><br>चित्रपट शाखा<br><br>इतर महोत्सव शाखा | श्री.रमेश पांचाळ, अधिक्षक | आस्थापना शाखा, चित्रपट शाखा, संस्था अनुदान, प्रजासत्ताक दिन,नवी दिल्ली,रंगभवन व्यवस्थापन, दक्षिण मध्य क्षेत्र,नागपुर,पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक कार्य, उदयपूर, फुलवालोंकी सैर, कुलू दशहरा महोत्सव, आंतरराज्य देवाण-घेवाण, पद्म पुरस्कार,सांस्कृतिक धोरण, फूलवालोंकी सैर,कुलू दशहरा महोत्सव, वेबसाईट, संगीत नाटक अकादमी. |
| मानधन शाखा व महोत्सव | श्री.विनोद धकाते,शाखा अधिक्षक | १. राज्य व केंद्र सरकार मानधन,संतपीठ, गुरुकुल, चित्रपटास अनुदान, सामाजिक, ऐतिहासिक, शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींवरील चित्रपट, हिंदी,सिंधी,गुजराती अकादमी, रेल्वे सवलत, कलाकार प्रमाणपत्र, सप्तरंग, महाराष्ट्र भुषण पुरस्कार, राज्य सांस्कृतिक पुरस्कार. |
| नाटयशाखा | श्री.साहेबराव जाधव,शाखा अधिक्षक | हौशी नाटय स्पर्धा,बालनाटय स्पर्धा,हिंदी, संस्कृत, संगीत )व्यावसायिक नाटय स्पर्धा, नाटय निर्मिती अनुदान, प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, संगीत रंगभूमी किर्लोस्कर पुरस्कार |
| लेखाविभाग | श्रीमती निलांबरी जाधव, लेखापाल | लेखापाल, प्रयोगसिद्ध कलांची प्रशिक्षण शिबिरे (नाटय/बालनाटय/तमाशा/किर्तन/शाहिरी) |
| इतर महोत्सव शाखा | श्री.रविंद्र गु.जाधव,शाखा अधिक्षक | लोककला अनुदान पॅकेज, विविध कला महोत्सव, लोकोत्सव, वाड्.मय पुरस्कार,लता मंगेशकर पुरस्कार, विठाबाई नारायणगांवकर पुरस्कार,ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार,श्री.पु.भागवत पुरस्कार,विं.दा.करंदीकर पुरस्कार, अकरावी प्रवेश प्रमाणपत्र, लावणी महोत्सव, तमाशा महोत्सव, दशावतार महोत्सव, पोवाडा महोत्सव, आदिवासी संगीत महोत्सव. |
| सहाय्यक इतर महोत्सव शाखा | श्री.अविनाश रेडीज, सहाय्यक | हिंदी,सिंधी,गुजराती अकादमी, कलाकार प्रमाणपत्र, रेल्वे सवलत, प्रजासत्ताक दिन, मुंबई, १ मे महाराष्ट्र दिन, १५ ऑगस्ट, सद्भावना दिन |

| | | |
|---|---|---|
| लेखाशाखा | श्री.मच्छिंद्र पाटील, सहाय्यक | लेखाशाखा पे बील,<br>प्रयोगसिद्ध कलांची प्रशिक्षण शिबिरे<br>(नाटय/बालनाटय/तमाशा/किर्तन/शाहिरी) |
| नाटयशाखा | श्रीमती अलका घोडके, सहाय्यक | नाटयशाखा<br>हौशी,बाल,हिंदी,संस्कृत,संगीत, व्यावसायिक नाटय स्पर्धा, नाटयनिर्मिती अनुदान, प्रभाकर पणशीकर जीवन गौरव पुरस्कार व संगीत रंगभूमी किर्लोस्कर पुरस्कार |
| लेखाशाखा | श्री.शिरीष धर्माधिकारी, सहाय्यक/भांडारपाल | लेखाशाखा आकस्मिक खर्चाची देयके, टी.ए.बील, खडीगंमत,केंद्र सरकार संस्था अनुदान,रंगभवन, आंतरराज्य देवाण-घेवाण,पद्य पुरस्कार, वेबसाईट, संगीत नाटक अकादमी. |
| लेखाशाखा | श्रीमती सीमा गायकवाड, रोखपाल | रोखपाल |
| आस्थापना शाखा | श्री.जयेश ब.मयेकर, सहाय्यक | आस्थापना शाखा, लता मंगेशकर पुरस्कार |
| आस्थापना शाखा | श्रीमती जयश्री घुगे, सहाय्यक | आस्थापना शाखा |
| नाटयशाखा | श्री.बबन मोरे, सहाय्यक | चित्रपट शाखा, २६ जानेवारी,नवी दिल्ली,फुलवालोंकी सैर,कुलू दशहरा महोत्सव, पोवाडा महोत्सव, आदिवासी संगीत महोत्सव, लावणी महोत्सव, तमाशा महोत्सव, दशावतार महोत्सव. |
| लेखाशाखा | श्रीमती सुरेखा गायकवाड, सहाय्यक | टी-ई, मानधन धनादेश वाटप |
| इतर महोत्सव शाखा | श्री.निलेश धुमाळ, सहाय्यक | वाड्.मय पुरस्कार,श्री.पु. भागवत पुरस्कार,वि.दा. करंदीकर पुरस्कार,लोककला अनुदान पॅकेज, विविध कला महोत्सव, लोकोत्सव, अकरावी प्रवेश प्रमाणपत्र, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार.विठाबाई नारायणगावंकर. |
| मानधन शाखा | श्री.महादेव भालेराव, सहाय्यक | मानधन शाखा, दर्जेदार चित्रपटास अनुदान, सामाजिक ऐतिहासिक शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींवरील चित्रपट, |
| आस्थापना शाखा | श्री.मिलींद बिर्जे, म.लि.टं. | मराठी टंकलेखनाचे काम सर्व शाखेचे. |

**ई मेल - dcapa@rediffmail.com**

**फॅक्स नं. ०२२ - २२०४३५५०**

**कार्यालयाचे दुरध्वनी क्र. : ०२२- २२८४२६३४**

**२२८४२६७० / २२०४३५५० / २२०४३५७१**

## सांस्कृतिक कार्य संचालनालय रचना

सांस्कृतिक कार्य संचालनालय हे कार्यालय सांस्कृतिक कार्यविभागाने निर्देशित केल्यानुसार शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करते. सध्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाची कोणतीही प्रादेशिक पातळीवर कार्यालय स्थापित झालेली नाहीत. त्यामुळे संपूर्ण राज्यातील सर्व आयोजनाचे व प्रशासनिक कामकाज सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई येथील कार्यालयाकडून होत असते.

सांस्कृतिक योजनेवरील कामकाज व प्रशासनिक बाब सहाय्यक, अधिक्षक,कार्यक्रम अधिकारी सह संचालक व संचालक यांच्यामार्फत होत असते. सोबत तक्ता जोडला आहे.

## महितीची सुलभता

आधुनिक काळाची गरज म्हणून विभागाची तसेच क्षेत्रिय कार्यालयाची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

# सांस्कृतिक कार्य संचालनालय कार्यालयाची माहिती

| अ.क्र. | पदनाम | माहितीच्या कायद्यानुसार हुद्दा | कार्यालयातील दूरध्वनी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती मीनल जोगळेकर | अपिलीय अधिकारी | ०२२-२२८४२६७० | संपुर्ण महाराष्ट्र |
| २. | श्री.एम.आर.सय्यद | शासकीय माहिती अधिकारी | ०२२-२२८४२६७० | संपुर्ण महाराष्ट्र |
| ३. | श्री.विनोद एन.धकाते | सहाय्यक माहिती अधिकारी | ०२२-२२८४२६७० | संपर्ण महाराष्ट्र |
| ४. | श्री.आर.जी.पांचाळ | सहाय्यक माहिती अधिकारी | ०२२-२२८४२६७० | संपर्ण महाराष्ट्र |
| ५. | श्री.रवींद्र गु.जाधव | सहाय्यक माहिती अधिकारी | ०२२-२२८४२६७० | संपर्ण महाराष्ट्र |
| ६. | श्री.साहेबराव आ.जाधव | सहाय्यक माहिती अधिकारी | ०२२-२२८४२६७० | संपर्ण महाराष्ट्र |
| ७. | श्री.निलांबरी ग.जाधव | सहाय्यक माहिती अधिकारी | ०२२-२२८४२६७० | संपर्ण महाराष्ट्र |

## ( अ) प्रदान करण्यात येणारे पुरस्कार

| अ.क्र. | पुरस्काराचे नांव |
|---|---|
| १. | महाराष्ट्र भुषण पुरस्कार |
| २. | गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार |
| ३. | ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार |
| ४. | नटवर्य प्रभाकर पणशीकर जीवन गौरव पुरस्कार |
| ५. | संगीताचार्य श्री.अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार |
| ६. | श्री.श्री.पु.भागवत पुरस्कार |
| ७. | श्री.विं. दा. करंदीकर पुरस्कार |
| ८. | विठाबाई नारायणगांवकर जीवन गौरव पुरस्कार |
| ९. | राज्य सांस्कृतिक पुरस्कार (१२ पुरस्कार) |
| ११. | राज्य वाड्.मय पुरस्कार (७८ पुरस्कार) |
| १२. | चित्रपट महोत्सव<br>चित्रपत्ी व्ही.शांताराम पुरस्कार<br>अ) चित्रपती व्ही.शांताराम जीवन गौरव पुरस्कार<br>ब) चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार<br>स्व.राज कपूर पुरस्कार<br>क) स्व.राजकपूर जीवन गौरव पुरस्कार<br>ड) स्व्.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार |

## ( ब ) आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धा

| अ.क्र. | स्पर्धेचे नांव |
|---|---|
| १. | नाटयस्पर्धा<br>हौशी नाटय स्पर्धा<br>हिंदी नाटय स्पर्धा<br>संगीत नाटय स्पर्धा<br>संस्कृत नाटय स्पर्धा<br>बालनाटय स्पर्धा,<br>अंतिम नाटय स्पर्धा<br>व्यावसायिक नाटयस्पर्धा |
| २. | चित्रपट स्पर्धा |

## ( क ) आयोजित होणारे महोत्सव

| अ.क्र. | महोत्सवाचे नांव |
|---|---|
| १. | नाटय महोत्सव<br>मराठी, हिंदी , संगीत, संस्कृत, बालनाटय, व्यावसायिक नाटय महोत्सव |
| २. | चित्रपट महोत्सव |
| ३. | लावणी महोत्सव |
| ४. | तमाशा महोत्सव |
| ५. | दशावतार महोत्सव |
| ६. | खडी गंमत महोत्सव |
| ७. | सप्तरंग महोत्सव |
| ८. | विविध कला महोत्सव |
| ९. | आदिवासी संगीत महोत्सव |

## ( ड ) आयोजित होणारे सांस्कृतिक कार्यक्रम

| अ.क्र. | सांस्कृतिक कार्यक्रम |
|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन, मुंबईतील चार ठिकाणी आयोजन |
| २. | १ मे महाराष्ट्र दिन मुंबईतील चार ठिकाणी आयोजन |
| ३. | फुलवालोंकी सैर- नवी दिल्ली |
| ४. | कुलू दशहरा, हिमाचल प्रदेश |
| ५. | प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय संचलन, नवी दिल्ली |
| ६. | पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर समन्वयाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन |
| ७. | दक्षिण मध्य क्षेत्र, नागपूर समन्वयाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन |

## ( ई ) प्रयोगसिद्ध कलांचे प्रशिक्षण शिबिरे

| अ.क्र. | सांस्कृतिक कार्यक्रम |
|---|---|
| १. | नाटय प्रशिक्षण शिबीर |
| २. | शाहिरी प्रशिक्षण शिबीर |
| ३. | किर्तन प्रशिक्षण शिबीर |
| ४. | तमाशा प्रशिक्षण शिबीर |
| ५. | बालनाटय प्रशिक्षण शिबीर |

## ( इ ) अनुदान योजना

| अ.क्र. | अनुदान योजना |
|---|---|
| १. | तमाशा फड साधन सामग्रीकरिता अनुदान पॅकेज |
| २. | दशावतार मंडळ यांना साधन सामग्रीकरिता अनुदान पॅकेज |
| ३. | सांस्कृतिक संस्थांना अनुदान |
| ४. | नवीन नाटय निर्मितीसाठी अनुदान |